स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे (राज्यशास्त्र) विद्याशाखेअंतर्गत पीएच.डी. पदवी प्रबंधाचा सादर करावयाचा शोध आराखडा

''आरक्षणाद्वारे न्याय प्रस्थापनेसाठी राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचे तुलनात्मक अध्ययन''

■ संशोधक ■

श्री. उदयकुमार नारायण लाड

सहायक प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग,
श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

■ मार्गदर्शक ■

डॉ. एस. बी. फड

विभागप्रमुख,
राज्यशास्त्र विभाग,
नेताजी सुभाषचंद्र बोस कॉलेज, नांदेड

जानेवारी 2018

‘‘आरक्षणाद्वारे न्याय प्रस्थापनेसाठी राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचे तुलनात्मक अध्ययन’’

■ **प्रस्तावना :**

भारतातील आरक्षण निर्मितीचे संपूर्ण श्रेय नि:संशय उच्चवर्णीय समाजाला जाते. इ.स.पूर्व २००० च्या दरम्यान ब्राह्मण समाजाने ऋग्वेद हा ग्रंथ लिहिला. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलात पुरुषसूक्तात ११ व्या व १२ व्या ऋचेत त्यांनी चातुवर्ण कसा निर्माण झाला ते सांगितले. ब्रह्माच्या मुखापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, मांड्यापासून वैश्य व पायापासून शुद्र निर्माण झाले. असे मिथक ब्राह्मण उच्चवर्णीयांनी जाणिवपूर्वक निर्माण केले. पुढे इ.स. पूर्व ३०० च्या दरम्यान भृगू ऋषीने मनुस्मृती या ग्रंथात चारही वर्णांची कामे स्पष्टपणे नोंदवली. मनुस्मृतीच्या पहिल्या अध्यायात ८८ ते ९१ या श्लोकात भृगूने खालील विचार मांडला.

ब्राह्मण : अध्यापन, अध्ययन, यजन, याजन, दान देणे व घेणे.

क्षत्रिय : प्रजेचे रक्षण, दान देणे, यज्ञ, अध्ययन व विषयात आसक्त न होणे

वैश्य : पशुंचे रक्षण, दान देणे, यज्ञ, अध्ययन, व्यापार, व्याज बट्टा, शेती.

शुद्र : वरील तीन वर्गांची मनात कोणतीही मत्सर न बाळगता सेवा करणे.

अशा प्रकारे ब्राह्मणवर्णीयांनी भारतात सर्वप्रथम आरक्षण धोरणाची निर्मिती केली. अध्यापन. यज्ञ करणे व दान करणे या तीन गोष्टी उच्चवर्णीय ब्राह्मण समाजाने कायमस्वरूपी स्वत:साठी १००% आरक्षण ठेवले. क्षत्रियांना शस्त्र धारण करण्याचा हक्क दिला. वैश्यांना व्यापार व शेती हे क्षेत्र आरक्षित ठेवले. शुद्रांना मात्र सर्व हक्क व अधिकारांपासून वंचित ठेवून कोणत्याही मोबदल्याशिवाय वरच्या वर्णांची सेवा करण्याचे काम दिले. शुद्रांनी सेवा करण्याचे नाकारले तर त्यांना पाप लागेल व ते नरकात जातील, अशी भितीही घालून ठेवली.

वरील आरक्षण धोरणाचे परिणाम संपूर्ण भारतवर्षाला घातक ठरतील असे झाले. उच्च वर्णीयांची पिढ्यान् पिढ्यांची प्रत्यक्ष कष्ट न करता ऐषआरामात जगण्याची सोय झाली. भारतातील सगळ्यात पहिले नोकरदार हे पुरोहित (भटजी) व शिक्षक आहेत. दोन्ही क्षेत्रे ब्राह्मण समाजासाठी १००% आरक्षित करणेत आली होती. कोणाला शिकवायचे आणि कोणाला शिकवायचे नाही हे त्यांनीच ठरवले. त्यामुळे हजारो वर्षे भारतातील बहुजनांना ज्ञानाचे दरवाजे बंद झाले; त्याची परिणिती महात्मा फुले म्हणतात,

तशी बहुजनांच्या गुलामीत झाली.

''विद्येविना मती गेली, मति विना नीती गेली
नीतिविना गती गेली, गतीविना वित्त गेले,
वित्ताविना क्षुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.''

भारतीय समाजात सर्वांगिण समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या त्रिसूत्रीद्वारे प्रत्यक्ष कार्यवाही होऊन न्याय प्रस्थापित व्हावा म्हणून ज्यांनी आपले आयुष्य सर्वस्वी पणाला लावले, त्यामध्ये महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य अद्वितीय ठरले.

महात्मा जोतिबा फुलेंनी सर्व शुद्र-अतीशुद्रांच्या कल्याणाचा मार्ग सांगितला. त्यांनी वर्णविद्वेषी व्यवस्थेला सुरुंग लावण्याचे कार्य हाती घेतले. उच्चवर्णीयांची बलस्थाने ओळखली व बहुजनांच्या अधोगतीची कारणे शोधली. त्याचवेळी महात्मा फुलेंनी जाणले की, जोपर्यंत समाजाच्या सर्व क्षेत्रात शुद्र-अतिशुद्र प्रवेश करणार नाहीत तोपर्यंत त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारणार नाही. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंच्या सहाय्याने स्त्री-शुद्रांसाठी शाळा उघडल्या. फुले दांपत्याच्या प्रयत्नाने स्त्री-शुद्रांना शिक्षणाचा अधिकार मिळाला. हा फक्त शिक्षणाचा अधिकार नव्हता तर माणूस असण्याचा, स्वत:ची विचारशक्ती, स्वत:चा मान सन्मान जिवंत ठेवण्याचा अधिकार होता. त्यामुळे वर्ण आरक्षणाने निर्माण झालेल्या विषमतावादी व्यवस्थेवर जबरदस्त आघात झाला. वर्णव्यवस्थेला सुरुंग लागला.

महात्मा फुलेंनी पुढे याच कारणाने सन १८८२ रोजी हंटर कमिशनसमोर साक्ष देताना ब्राह्मणेतर जातीतील उमेदवारांना प्रशासकीय नोकरीत स्थान देण्याची पहिली मागणी केली. तसेच ग्रामीण व दलित विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विशेष प्रलोभने (स्कॉलरशिप) ठेवावीत. अशी मागणी केली. अशाप्रकारे महात्मा फुलेंनी भारतात सर्वप्रथम शुद्रातिशुद्रांसाठी (दलित मागासांसाठी) आरक्षणाची संकल्पना मांडली.

कोल्हापूर संस्थानचे राजे राजर्षी शाहू महाराज हे महाराष्ट्रातील वेगळे व्यक्तीमत्त्व होते. या व्यक्तीमत्त्वाने अनेक वेगळ्या गोष्टी करून दाखवल्या आहेत. परंतु त्यांनी सामाजिक परिवर्तनाची चालू केलेली प्रक्रिया ही त्यांच्या कारकीर्दीतील अत्यंत मोलाची कृती आहे. कोल्हापूरसारख्या ऐतिहासिक परंपरेने थोर अशा संस्थानात रुढीप्रधान चातुवर्ण्यावर आधारीत समाज जीवनात परिवर्तनाचे क्रांतिकारक स्वरुपाचे जे कार्य केले, त्याचे परिणाम दूरगामी झाले. त्याकाळी संपूर्ण महाराष्ट्र या विचारक्रांतीने ढवळून निघाला.

राजर्षी शाहू महाराज हे महात्मा फुले यांनी निर्माण केलेल्या आरक्षणाच्या विचारांची प्रत्यक्ष

अंमलबजावणी करणारे पहिले राजे होत. शाहू महाराजांनी मराठा, अस्पृश्य व मागासवर्गांची हालाखीची परिस्थिती जाणली. कारण १९०१ च्या जनगणनेत असे आढळून आले की, संस्थानामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय श्रेणीच्या नोकऱ्यांमध्ये एकही मराठा किंवा अन्य जातीचा माणूस नाही. तेथे फक्त ब्राह्मणांची खोगीर भरती झालेली आहे. म्हणून २६ जुलै १९०२ साली राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थान भारतातील पहिले, 'समाजवादी आरक्षण' लागू केले. मराठा जातीसह अस्पृश्य, इतर मागास, भटके व विमुक्त या सर्वांसाठी त्यांनी नोकरीतील ५०% जागा आरक्षित ठेवण्याचा अभूतपूर्व निर्णय घेतला. या निर्णयाचा सर्वात जास्त फायदा मराठा जातीला झाला. म्हणूनच आधुनिक आरक्षणाचा पहिला लाभार्थी होता एक मराठा – भास्करराव जाधव!

आम जनतेला शिक्षण द्यावे, स्वत:चे जीवनमान उंचावण्यास उद्युक्त करावे, अंधश्रद्धा नष्ट कराव्यात आणि जिच्यामुळे समाजात एक विलक्षण कृत्रिमता आली आहे. त्या विषमतेची कारणे समूळ नाहीशी करावीत या हेतूने राजर्षी शाहू महाराजांनी जिद्दीने सतत प्रयत्न केले. जातीच्या नावाने तयार झालेली बंधने नष्ट व्हावीत, यासाठी त्यांनी बहुमोल प्रयत्न केले. राजर्षी शाहू महाराजांचे समाजात न्याय प्रस्थापित करण्यासंबंधी बहुमोल असे योगदान असलेले दिसून येते.

महाराजा सयाजीराव गायकवाड हे स्वातंत्र्यपूर्व काळातील बडोदे संस्थानचे संस्थानिक होते. त्यांनी बडोदे संस्थानात विषमता निर्मूलनाचे उल्लेखनीय कार्य केले. बडोद्यामध्ये सामाजिक शैक्षणिक, राजकीय, आर्थिक इ. बाबतीत विषमता पसरलेली होती. सयाजीराव महाराजांनी त्यांच्या प्रजेमध्ये समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करून अनेक योजना राबविल्या. त्यांच्या कार्याबद्दल इतिहासाची वि. का. रजवाडे म्हणतात की, 'भारतातील शंभर वर्षातील कर्तृत्ववान व्यक्तीत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा उल्लेख पहिल्यांदा करावा लागेल.'

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी नोकरभरतीच्या बाबतीत कधीही जात, प्रांत, वंश, धर्म अशा गोष्टींचा विचार केला नाही. तर हे भेद नाहीसे करण्याचा प्रयत्न केला. महाराजांनी पाऊणलाख हुकूम काढले. ते स्त्रीशिक्षण, धर्म, तत्त्वज्ञान, सामाजिक समस्या, राजकीय समस्या, शैक्षणिक समस्या या विषयी होते. गाव तेथे ग्रामपंचायतीची स्थापना करून सर्व जाती धर्मांना निवडणुकीत भाग घेण्याविषयी तरतूद केली. महाराजा सयाजीराव गायकवाड सत्तेवर येण्यापूर्वी बडोदे संस्थानात अस्पृश्यता पाळली जायची. अस्पृश्यता किंवा चातुवर्ण व्यवस्था ही ईश्वरनिर्मित आहे अशी लोकांची समजूत होती. महाराजांनी अशा खोट्या समजूतींवर आधारलेल्या विषमतेमुळे समाजाचे व राज्याचे कसे नुकसान होते हे समाजाला पटवून दिले. बडोदे संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केल्यामुळे मागास, अस्पृश्य, वंचित लोक शिक्षणाच्या प्रवाहात आले. आरोग्याच्या मोफत सुविधा, धार्मिक स्वातंत्र्य, शैक्षणिक हक्क याविषयी कायदे केले. अस्पृश्यता, लिंगभेद, विटाळाच्या कल्पना व बिगारी आर्थिक

शोषण या समस्यांवर मात करून सत्य, प्रेम, परस्पर विश्वास, सुरक्षा, मानवी प्रतिष्ठा ही मूल्ये रुजवण्याचा महाराजांनी प्रयत्न केला.

धर्माविषयी अनेक चुकीच्या समजुती अस्तित्वात होत्या. पण महाराजांनी मानवता हा एकच धर्म पाळणे उचित ठरविले होते. असमतेच्या कल्पनांनाच धर्मसमजून चुकीच्या रुढी पाळल्या जात होत्या. हे महाराजांच्या लक्षात आले, त्यांनी बडोदे संस्थानात समतेवर भूतदयेवर आधारित धर्म स्थापन करण्याचा प्रयत्न केला.

■ संशोधन विषयाचे महत्त्व :

'आरक्षणाद्वारे न्याय प्रस्थापनेसाठी राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचे तुलनात्मक अध्ययन' या विषयाचे माझे संशोधनाचे प्रयोजन आहे. राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी दलित व वंचित लोकांसाठी कायदे करून त्याची अंमलबजावणी केली. सार्वजनिक धोरणात वंचितांना महत्त्व दिले गेले. दलितांना एक राजकीय स्थान प्राप्त झाले. १८७५ साली भारतावर ब्रिटिशांचे राज्य होते. अनेक संस्थानिक जनतेच्या हक्कापेक्षा व कल्याणापेक्षा स्वत:च्या सुखाकडे अधिक लक्ष देत होते. पण राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या राजे होण्याच्या संधीचा फायदा उठविला. जनतेचे हित हाच राज्यकारभार मानून त्यांनी वंचितासाठीच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक आणि शेतीच्या सुधारणा केल्या. वंचित लोकांच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्याकडे कटाक्षाने लक्ष दिले. तसेच परराष्ट्रांचा अभ्यास करून चांगल्या गोष्टी आचरणात आणल्या. ब्रिटिश हिंदुस्थानातही जे प्रयत्न झाले नाहीत असे प्रयोग कोल्हापूर व बडोदे संस्थानात व्हायचे व त्याचे महत्त्व पटल्यानंतर त्याचे अनुकरण ब्रिटिश हिंदुस्थानात करायचे. अशा तऱ्हेने राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी इतर संस्थानापेक्षा कोल्हापूर व बडोदे संस्थानाला नेहमीच महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले. याचे श्रेय राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांनाच जाते. राज्यशास्त्रीय दृष्टीकोणातून त्याचे फारसे संशोधन झालेले नाही. त्यांनी आरक्षणाद्वारे न्यायप्रस्तापनेसाठी महत्त्वाचे कार्य करून समाजातील शैक्षणिक, सामाजिक, वैचारिक विषमता कमी करण्यासाठी फार मोठे योगदान दिले आहे. त्याची ओळख समाजाला होणे महत्त्वाचे आहे.

दोन्ही संस्थानामधील दोन्ही राजांनी आरक्षणाबाबत घेतलेले निर्णय, त्याचा समाजाला झालेला फायदा, त्यातून नवसमाज निर्मितीला मिळालेली चालना भारतीय राजकारण, समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था, राज्यघटना, चळवळी यावर पडलेला प्रभाव यांचा तुलनात्मक पद्धतीने अभ्यास झालेला नसल्याने त्याचे तुलनात्मक अध्ययन होणे गरजेचे वाटत असल्याने या विषयाची मी संशोधनासाठी निवड केली आहे.

■ संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. राजर्षी शाहू महाराज यांच्या आरक्षणाद्वारे न्याय प्रस्थापनेसाठीची भूमिका व कार्ये जाणून घेणे.

२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आरक्षणाद्वारे न्याय प्रस्थापनेसाठीची भूमिका व कार्ये जाणून घेणे.

३. राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आरक्षणाद्वारे न्यायप्रस्थापने संदर्भातील भूमिकेतील समानतेच्या धाग्यांचा शोध घेणे.

४. राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आरक्षणाद्वारे न्यायप्रस्थापने बाबतची मतमतांतरे, विसंगती जाणून घेणे.

५. राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आरक्षणाद्वारे न्यायप्रस्थापने बाबतची सार्वकालीन उपयुक्तता तपासणे.

■ संशोधनाची गृहितके :

१. आरक्षणाचे धोरण न्याय प्रस्थापनेसाठी व्यवहार्य आहे.

२. राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी समाज जीवनाच्या विविध क्षेत्रात आरक्षणाद्वारे न्याय प्रस्थापनेची कार्ये केली.

३. राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आरक्षणाद्वारे न्यायप्रस्थापना धोरणामुळे समाजात न्याय प्रस्थापना प्रक्रियेस चालना मिळाली.

४. राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आरक्षण धोरणामुळे समाजातील वंचितांना फायदा होऊन त्यांचा विकास घडून आलेला आहे.

५. आरक्षणाद्वारे न्याय प्रस्थापना धोरणामुळे समाजजीवनाच्या अनेक क्षेत्रांमध्ये अमूलाग्र परिवर्तन घडून आले आहे.

■ संशोधन समस्या विधान :

आरक्षण ही संकल्पना प्रथम महात्मा फुले यांनी मांडली. परंतु त्याला मूर्त स्वरूप देणेचे कार्य राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी केले. आरक्षण हा न्यायप्रस्थापनेसाठी महत्त्वाचा घटक असल्याची बहुसंख्य समाजसुधारकांची भूमिका होती व त्यासाठी त्यांनी सातत्याने आग्रह धरला व प्रत्यक्ष कृती केल्या यासाठी प्राधान्यक्रमाची भूमिका छत्रपती शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी घेतली. सबब 'आरक्षणाद्वारे न्याय प्रस्थापनेसाठी राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचे तुलनात्मक अध्ययन' या समस्या विषयावर सलग, साधार, सटीक संशोधन करण्याचा संशोधकाचा मानस आहे.

■ संशोधन पद्धती :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी ऐतिहासिक व तुलनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. तसेच प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे माहिती संकलीत करून संशोधन केले जाणार आहे.

प्राथमिक साधने :

भारतीय संविधान, संशोधनविषयासंबंधी संदर्भ ग्रंथ, ऐतिहासिक दस्ताऐवज, केंद्र व राज्य शासनाचे या संबंधीचे अहवाल, मार्गदर्शक पुस्तिका, ऐतिहासिक नोंदी असलेले साहित्य, गौरव ग्रंथ इत्यादीद्वारे प्राथमिक माहिती संकलित केली जाणार आहे.

दुय्यम साधने :

संशोधन विषयाच्या संदर्भात प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, संदर्भग्रंथाचा दर्जा असलेली संदर्भीय पुस्तके, संशोधनपर लेख, मासिके, साप्ताहिके यातील लेख, नियतकालिके, संदर्भ पुस्तके, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादींचा वापर करणेत येईल.

इत्यादी साहित्यांच्या आधारे माहिती संकलित करून त्यांचे विश्लेषण करून सलग, साधार व सटीक मांडणीच्या आधारे तुलनात्मक संशोधन केले जाणार आहे.

■ प्रकरण योजना :

प्रकरण १ : प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रकरण २ : आरक्षण व न्यायाची संकल्पना

प्रकरण ३ : राजर्षी शाहू महाराजांची आरक्षणाद्वारे न्याय प्रस्थापनेसाठीची भूमिका व कार्ये

प्रकरण ४ : महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे आरक्षणाद्वारे न्याय प्रस्थापनेसाठीची भूमिका व कार्ये

प्रकरण ५ : राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे आरक्षणाबाबत व विचारांचे व कार्याचे तुलनात्मक अध्ययन

प्रकरण ६ : उपसंहार, संशोधनाचा प्रकरणशः आढावा, गृहीतकांची पडताळणी व निष्कर्ष

■ संदर्भ ग्रंथ :

१. भणगे आर. पी. : 'आरक्षणाची वाटचाल आणि ओबीसी आरक्षण' डायमंड पब्लिकेशन पुणे, २०१६

२. पंडित नलिनी : 'जातीवाद आणि वर्गवाद' साधना प्रकाशन, पुणे, १९७८

३. वाघमारे वसंत : 'जातीव्यवस्था निर्मिती आणि स्वरूप' सुगावा प्रकाशन, पुणे, २००६

४. चव्हाण रा. ना. : 'राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्ये'

५. संपा. जाधव रमेश : 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ' तिसरी आवृत्ती २०१६, प्रकाशक महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई

६. बागल भाई माधवराव : 'शाहू महाराजांच्या आठवणी' प्रकाशक - भाई माधवराव बागल विद्यापीठ, कोल्हापूर.

७. किर धनंजय : 'राजर्षी शाहू छत्रपती' तिसरी आवृत्ती, २०१६, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

८. बागडे द. बा. : 'राजर्षी शाहू महाराज आणि कायदे कानू' कोल्हापूर, १९८२

९. डॉ. पवार जयसिंगराव : 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ' कोल्हापूर, २००१

१०. आपटे दाजी नाकेश : 'श्री महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे), बडोदे, १९३६

११. भांड बाबा : 'लोकपाळ राजा सयाजीराव' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१३

१२. दादूमिया : 'श्रीमंत सयाजीराव गायकवाड', गंधर्ववेद प्रकाशन, पुणे, २०१०

१३. दांडेकर वि. पां. : 'सयाजीराव महाराज, व्यक्ती आणि कार्य' ग. ल. ठोकळ प्रकाशन पुणे, १९५३

१४. Dr. Kunte B. G. : Descriptive Catalogue of Papers Relating to Rajarshi Shahu Chatrapati (Vol. 1), Published - Gov. of Maharashtra, 184-1922

१५. वर्तमानपत्रे : पुढारी, सकाळ, लोकमत, तरुण भारत, महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता

१६. संकेतस्थळे : www.maharashtra.gov.in

: www.wekipedia

उदयकुमार लाड	**डॉ. एस. बी. फड**
संशोधक विद्यार्थी	संशोधक मार्गदर्शक